प्रकरण : 2 रे

लेखक परिचय

पृष्ठ क्रमांक 27 ते 30

## प्रकरण : 2

## लेखक परिचय

संपूर्ण नांव - सखाराम भीमराव कलाल.

जन्म - 10 डिसेंबर 1938.

जन्मस्थळ - बेळगाव जिल्हयातील रायबाग या गावी.

शिक्षण - एम.ए., बी.लिब.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण रायबान येथे.

1957 मध्ये मॅट्रिक परीक्षा पास. त्यावेळी रायबागमध्ये गुणानुक्रमे प्रथम.

1968 मध्ये तत्वज्ञान व समाजशास्त्र विषय घेऊन एम.ए.

1969 मध्ये बी.लिब.

**सखा कलाल यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण :-**

लेखकाच्या जडणघडणीमध्ये त्याची आर्थिक परिस्थिती, घरातील अनुकूल वातावरण हे ब-याच अंशी सहाय्यभूत होत असते. अशी अनुकूल परिस्थिती लाभलेल्या व्यक्तीने साहित्यक्षेत्रात कामगिरी केली तर त्या व्यक्तीविषयी आपणाला विशेष नवल वाटत नाही. परंतु अतिशय प्रतिकूल परिस्थिती असताना एखादी व्यक्ती आपले शिक्षण पूर्ण करते, साहित्यक्षेत्रात आपला ठसा उमटवते त्यावेळी मात्र त्या लेखकांविषयी त्याच्या कर्तृत्वाविषयी वाचकाच्या मनांत कुतूहल निर्माण होते. कलालांचे व्यक्तिमत्व देखील असेच कुतूहल निर्माण करणारे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कलालांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

कलालांचे प्राथमिक शिक्षण रायबाग येथे मराठी मुलांच्या शाळेत झाले. रायबाग विद्यालयात माध्यमिक शिक्षण झाले. 1957 साली मॅट्रिक परीक्षा उ-तीर्ण झाले. त्यावेळी गुणानुक्रमे रायबागमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. पुढे सांगलीच्या वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची प्रबळ इच्छा असते. परंतु पुढे शिकायचे कसे? हा प्रश्न होता. घरातील परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यामुळे बाहेरगावी जाऊन शिक्षण घेणे शक्य नव्हते. त्यांच्याच गावातील निंगनुरे मास्तर नावाचे पुढारी होते. ते सरपंच होते. त्यांनी पंचायतीत चिटणीसाचे काम दिले. 65 रुपये पगार मिळू लागला. दहा महिने हे काम करुन 650 रुपये साठवले. पैसे जमल्यावर ती नोकरी सोडून कोल्हापूरला आले. त्यांच्या गावांतील व्हनकुप्पे नावाचे ग्रहस्थ कोल्हापूरला होते. त्यांच्या खोलीवर काही दिवस राहून राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. काही दिवसा-नंतर शिवाजी बोर्डिंगमध्ये राहू लागले. परंतु तेथेही खर्च कसा भागवायचा ? हा प्रश्न होताच. शिवाजी बोर्डिंग समोरील पद्मा गेस्टहाऊसमध्ये दादासाहेब चव्हाण यांच्यामुळे रात्रपाळीचा कारकून म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे शिक्षण चालू राहिले. प्री-डीग्रीला फर्स्टक्लास मिळाला. दीड वर्षाच्या कालावधीनंतर पुन्हा त्यांच्या जीवनामध्ये एक संकट आले. पुण्याच्या एका लेखकांने पत्र पाठवून त्यांच्याकडे पुण्यास राहायला बोलविले. पुण्याच्या या गृहस्थावर विश्वास ठेवून पद्मा गेस्ट हाऊसमधील नोकरी सोडली. त्यामुळे राजाराम कॉलेजही सोडावे लागले. पुण्यात जाऊन त्या लेखकाकडे लिखाण करत करत "विद्येचं माहेरघर" असलेल्या पुणे शहरात फर्ग्युसन सारख्या नामांकित महाविद्यालयात शिक्षण घ्यायचे असं मनात ठरवले होते. परंतु त्या लेखक महाशयाकडे गेल्यानंतर घरगड्यासारखी वागणूक मिळू लागली. शिवाय फर्ग्युसन कॉलेज दीड मैलावर होते. तेवढे अंतर पायी चालावे लागे. या सर्व त्रासाला कंटाळून ते पुन्हा कोल्हापूरला आले.

कोल्हापूरला परत आल्यानंतर महाद्वार रोडवरील शेरेकन लॉजमध्ये कारकून म्हणून काम करु लागले आणि राजाराम कॉलेजमध्ये दाखल झाले. 1962 मध्ये "तत्वज्ञान" हा मुख्य विषय घेऊन बी.ए. झाले. अशा अनेक आपत्तींना तोंड देत पदवी मिळविण्याचा हेतू सफल झाला होता. त्यामुळे गावाकडे जाऊन नोकरीसाठी अर्ज करु लागले. त्याच दरम्यान शिवाजी विद्यापीठाचे काम सुरु झाले होते. त्यावेळचे कुलसचिव मा.य. वैद्य यांची भेट घेतली. त्यांनी विद्यापीठात क्लार्कची नोकरी दिली. 1963 पासून विद्यापीठात क्लार्क म्हणून काम करु लागले. ही नोकरी मिळाल्यानंतर एम.ए. करण्याची इच्छा निर्माण झाली. 1968 मध्ये तत्वज्ञान व समाजशास्त्र विषय घेऊन एम.ए. झाले. त्यानंतर 1969 मध्ये बी.लिब. ची परीक्षा सेकंड क्लासमध्ये पास झाले. विद्यापीठातील नोकरीचा राजीनामा दिला. सोलापूर कॉलेजमध्ये नोकरी मिळाली. परंतु सोलापूरमध्ये त्यांचे मन रमले नाही.

त्यानंतर 1970 मध्ये कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर येथे ग्रंथपालाची नोकरी मिळाली. तेव्हापासून आजतागायत याच कॉलेजमध्ये ग्रंथपालाची नोकरी करत आहेत.

**कौटुंबिक परिस्थिती :-**

कलालांना भाऊ-बहीण नाही. पत्नी सौ. इंदूमती धर्मेश, राजेश, सतीश असे तीन मुलगे व सुनीता ही मुलगी असा परिवार आहे. कलालांचे कुटुंब कोल्हापूरमध्ये स्थायिक झाले आहे.

**लेखन-वाचन संस्कार :-**

रायबाग विद्यालयात माध्यमिक शिक्षण घेत असताना माधव मोर्डेकर नावाचे मुख्याध्यापक होते. त्यांच्याकडे "सत्यकथा" चे अंक येत. मोर्डेकर दर रविवारी कोल्हापूरला जात, त्यावेळी मासिके व पुस्तके घेऊन येत. त्यांच्याकडून कलालांना सत्यकथेचे अंक, इतर मासिके व पुस्तके मिळत. तेव्हापासून कलालांना वाचनाची आवड लागली. त्यावेळी सत्यकथेत गो.नी. दांडेकरांची "कुणा एकाची भ्रमणगाथा" ही कादंबरी येत होती. ग.ल. ठोकळांची "गावगुंड" ही कादंबरीही येत होती. ही पुस्तके त्या काळात वाचली. शिवाय वि.स. खांडेकरांचेही भरपूर साहित्य कलालांनी वाचले होते.

**कलालांचे आवडते साहित्यिक :-**

वि.स. खांडेकर, गो.नी. दांडेकर, श्री.ना. पेंडसे, इरावती कर्वे.

**कलालांची कथालेखनास सुरुवात :-**

राजाराम कॉलेजमध्ये प्री-डीग्रीला असताना खूप वाचन करीत होते. त्यावेळी अनेक विचारांचे मंथन त्यांच्या मनात चालू होते आणि यातूनच "हिरवी काच" ही कथा लिहिली. सदाशिव आठवले नावाचे इतिहासाचे प्राध्यापक होते. त्यांनी ती कथा वाचली. ही कथा बाहेर मासिकाकडे पाठवावी असे त्यांनी सुचविले. त्यामुळे ती "सत्यकथे"ला पाठवून दिली. ती सत्यकथेच्या मे 1959 च्या अंकात प्रसिध्द झाली.

त्यानंतर खालीलप्रमाणे कथा लिहिल्या आणि प्रसिध्द झाल्या.

| | | |
|---|---|---|
| विहीर | सत्यकथा | मार्च 1960 |
| रान | सत्यकथा | सप्टेंबर 1960 |
| फेड | सत्यकथा | सप्टेंबर 1960 |
| टोचणी | सत्यकथा | मे 1963 |
| खून | सत्यकथा | ऑगस्ट 1965 |

| | | |
|---|---|---|
| नाच्या | सत्यकथा | डिसेंबर 1966 |
| इरादा | सत्यकथा | एप्रिल 1967 |
| वड | सत्यकथा | मे 1968 |
| मादी | सत्यकथा | ऑगस्ट 1968 |
| बळी | सत्यकथा | ऑक्टोबर 1968 |
| खेळ | सत्यकथा | मे 1969 |
| ऊन | धरती | दिवाळी 1969 |
| कोंबडा | सत्यकथा | मे 1970 |
| भोग | धरती | मे 1970 |
| ढग | सत्यकथा | जून 1971 |
| बंध | सत्यकथा | जानेवारी 1973 |

वरील अठरा कथांचा "मौज" प्रकाशनतर्फे ऑक्टोबर 1974 मध्ये "ढग" हा पहिला कथासंग्रह प्रसिध्द झाला. "ढग" या कथासंग्रहाला 1976 मध्ये शासनाचा पुरस्कार मिळाला.

त्यानंतर दहा कथांचा "मौज" प्रकाशनतर्फे ऑगस्ट 1983 मध्ये "सांज" हा कलालांचा दुसरा कथासंग्रह प्रसिध्द झाला. या संग्रहातील कथादेखील अगोदरच प्रसिध्द झाल्या होत्या.

| | | |
|---|---|---|
| गठुळं | किर्लोस्कर | डिसेंबर1970 |
| नीती | सत्यकथा | फेब्रुवारी 1974 |
| सांज | सत्यकथा | सप्टेंबर 1974 |
| कंदुरी | सत्यकथा | फेब्रुवारी 1975 |
| अखेर | सत्यकथा | जुलै 1975 |
| धनी | बिल्वदल | ऑगस्ट 1977 |
| दु:ख | सत्यकथा | सप्टेंबर 1977 |
| रात्र | मराठवाडा | दिवाळी 1979 |
| वाटणी | मराठवाडा | दिवाळी 1980 |
| पंगत | सत्यकथा | डिसेंबर 1980 |

xxxxx

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR